• केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते महामेट्रो व एनएचएआयला आशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड प्रमाणपत्र

• शहराकरता ट्रॉली बसचा डीपीआर तयार करा : श्री गडकरी यांची महा मेट्रोला सूचना

• दोन्हीही रेकॉर्ड्सचे श्रेय महा मेट्रो टीमचे : डॉ दीक्षित यांचे प्रतिपादन



नागपूर, १० जुलै: वर्धा मार्गावरील डेबल डेकर पूल व त्यावरील तीन मेट्रो स्टेशन तयार करणारी महामेट्रो व राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाची (एनएचएआय) नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् ने घेतली. या दोन्ही संस्थांकडून आज महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षित व भारतीय राष्ट्रीय महामार्ग (एनएचएआय) चे श्री राजीव अग्रवाल यांना केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.




आशियातील सर्वात लांब आणि सर्वात जास्त मेट्रो स्थानके असलेल्या प्रकल्पामध्ये नागपूर मेट्रो रेल प्रकल्पा अंतर्गत वर्धा महामार्गावरील डबलडेकर उड्डाणपूल आणि छत्रपती चौक, जय प्रकाश नगर आणि उज्जवल नगर मेट्रो स्टेशनची नोंद आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये झाली आहे. आज त्याची रीतसर घोषणा करण्यात आली. आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स संस्थेच्या अधिकाऱ्यांतर्फे सदर पुरस्कारा संबंधित प्रमाणपत्र आणि पदक महा मेट्रोला आज प्रदान करण्यात आले.

एअरपोर्ट साऊथ मेट्रो स्टेशनच्या सभागृहात झालेल्या या समारंभात महामेट्रोचे प्रकल्प संचालक श्री महेश कुमार, इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या प्रतिनिधी श्रीमती चित्रा जैन, आशिया बुक ऑफ रेकॉर्डच्या प्रतिनिधी डॉ. सुनीता धोटे, समन्वयक श्री प्रकाश पोहरे व्यासपीठावर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना नागपूर मेट्रो देशात सर्वोत्तम असल्याचे नमुद करीत श्री गडकरी म्हणाले, पुण्यातही आता विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी नागपूरसारखीच मेट्रो तयार करण्याचे सांगितले. या डबल डेकर पुलासाठी काम करताना महामेट्रो व एनएचआयचा प्रत्येकी २०, अर्थात ४० टक्के खर्च वाचला. कामठी रोडवरही असाच उड्डाणपूल तयार होत आहे. दोन महिन्यांत या पूलाचेही उद्‌घा टन होईल.




आता देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. त्यामुळे नवीन विमानतळाचे कामही लवकरच सुरू होईल. महामेट्रोने आपली बस चालवायला घ्यावी, अशी सूचना त्यांनी केली. प्रास्ताविक प्रकल्प संचालक महेशकुमार यांनी तर संचालन श्वेता शेलगावकर यांनी केले. मेट्रोचे संचालक अनिल कोकाटे यांनी आभार मानले.

• कळमना ते वासुदेव नगर ट्रॉली बस

कळमना मार्केट ते हिंगणा रोडवरील वासुदेव नगर, या रिंगरोडने ट्रॉली बसचा (हवेतील बस) डीपीआर तयार करण्याच्या सूचना त्यांना महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रजेश दिक्षित

यांना केल्या. सोमलवाडा ते मनीषनगर व इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ते झिरो माईल, अशा दोन भुयारी मार्गाचे काम मेट्रोने करावे, असे गडकरी म्हणाले.

• आणखी एका विक्रमासाठी सज्ज: डॉ. दिक्षित

शहरातील मेट्रो प्रकल्प हा विकासाचा आलेख असून सातत्याने वाढणारी प्रवासी संख्या हे नागपूरकरांनी मेट्रो प्रकल्पाला स्वीकारल्याचे द्योतक असल्याचे श्री दीक्षित म्हणाले. आशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतलेली दखल मागील सात वर्षात केलेल्या कामाची पावती आहे. आता आणखी एक रेकॉर्ड करण्यासाठी मेट्रो सज्ज असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी सांगितले. नवा रेकॉर्ड नव्या तंत्रज्ञानासह होईल. प्रवासी संख्येचेही नवे विक्रम होत असल्याचे ते म्हणाले. आज आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स संस्थांनी दिलेला हा सन्मान महा मेट्रोच्या संपूर्ण टीम मुळे शक्य झाल्याचे डॉ दीक्षित म्हणाले. सात वर्षाच्या या प्रवासात आपल्या महा मेट्रोच्या कर्मचाऱ्यांनी मोलाची साथ दिली असे देखील ते म्हणाले.